*Nashik District Maratha Vidya Prasarak Samaj's*

# KSKW Arts, Science & Commerce College, Cidco, Nashik.

## Department of History

# *Certificate*

*This is to certify that Mr. /Miss* पाटील वैष्णवी राजेंद्र

*Is a student of T.Y.B.A has successfully completed project work on at* अजिंठा लेणी.

*Under my guidance & direction. This work carried out during the academic year 2021-2022 toward partial fulfillment of bachelor in Art Degree course of SP Pune University.*

*Throughout the project he/she is found sincere, regular and hard working.*

*Teacher Guide*
**Prof. S. K. Aware**

**Place: Cidco, Nashik**

**Date:** 18/05/2022

**Head**
**Dept. of History**
KSKW, ACS College, CIDCO, Nashik

# अनुक्रमणिका


- इतिहास
- विषयाची प्रस्तावना संपूर्ण विषयाची संशोधनाची माहिती
- स्वरूप / रचना
- लेण्यांचा अनुक्रम
- निष्कर्ष
- समारोप आभार
- संदर्भ आणि नोंदी

# प्रस्थावना

**अजिंठा लेणी** ह्या तालुका सोयगाव औरंगाबाद जिल्ह्यातील इ.स. पूर्व २रे शतक ते इ.स. ४थे शतक अशा प्रदीर्घ कालखंडात निर्मिलेल्या २९ बौद्ध लेणी आहेत. औरंगाबाद शहरापासून १०० ते ११० कि.मी. अंतरावर वाघूर नदीच्या परिसराशेजारी या लेणी आहेत.ह्या लेणी नदीपात्रापासून १५-३० मीटर (४०-१०० फूट) उंचीवर विस्तीर्ण अशा डोंगररांगामधील कातळांवर कोरल्या आहेत.

बौद्ध धर्माचा वारसा जतन करणारी प्रदीर्घ ऐतिहासिक कालखंडाची पार्श्वभूमी लाभलेली अजिंठा लेणी या भारताची जागतिक आंतरराष्ट्रीय पर्यटनासाठी ठळक ओळख करून देणाऱ्या महत्त्वाच्या लेणी आहेत. लेणी घनदाट जंगलाने वेढलेल्या आहेत.भारताच्या केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या प्रतिष्ठित पर्यटन स्थळ प्रकल्पात देशातील १२ पर्यटन स्थळांची निवड करण्यात आली असून महाराष्ट्रातील अजिंठा व वेरूळच्या लेण्यांचा या यादीत समावेश आहे.

**अजिंठा**

स्थापत्यकला, शिल्पकला व चित्रकलेसाठी जगप्रसिद्ध लेणी.



माध्यमे अपभारण करा

विकिपीडिया

| | |
|---|---|
| **प्रकार** | गुहा,<br>artificial cave,<br>मंदिर |
| **चा आयाम** | Buddhist caves in India |
| **स्थान** | औरंगाबाद जिल्हा, औरंगाबाद विभाग, महाराष्ट्र, भारत |
| **वारसा अभिधान** | जागतिक वारसा स्थान (Ajanta Caves, World Heritage selection criterion (i), World Heritage selection criterion (ii), World Heritage selection criterion (iii), World Heritage selection criterion (vi), इ १९८३ .स.– )<br>Monument of National Importance |
| **स्थापना** | 2 century BC<br>2 century BC |
| **क्षेत्र** | ८,२४२ ha (जागतिक वारसा स्थान) |

# विषयाची उद्दिष्ट्ये

- ✓ अजिंठा लेणी हि जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केली आहे . या विषयाचा संपूर्ण अभ्यास व्हावा हे माझे मुख्य उद्दीष्टे आहे .
- ✓ २९ बौद्ध लेणी आहेत. त्यांचा अभ्यासाचे महत्वाचे उद्दिष्टे आहे .
- ✓ अजिंठा लेण्यांत गौतम बुद्धाच्या विविध भावमुद्रा तसेच बौद्ध तत्त्वज्ञानाला चित्रशिल्प रूपात व्यक्त करणाऱ्या शिल्पकलेचा अद्वितीय आविष्कार पाहायला मिळतो.
- ✓ चित्र—शिल्पकलेचा नितांतसुंदर अनुभव देण्याऱ्या या लेण्यांमधून त्या काळात वापरण्यात आलेल्या रंगछटा पर्यटकांना पाहावयास मिळतात.

# इतिहास

प्राचीन भारतात धर्मशाळा, लेणी क्वचित मंदिरेसुद्धा मुख्यत्वे व्यापारी मार्गावर विश्रांतीसाठी उभारण्यात येत असत. त्यांचा उद्देश वाटसरूंना सुरक्षित आश्रय स्थान मिळावे असा असे. त्यांना राजाश्रय, धर्माश्रय व लोकाश्रय असे. अजिंठा गावाजवळच्या लेण्यांची निर्मितीही याच उद्देशातून सुरू झाली असावी असे मानले जाते.

या लेण्यांचा शोध ब्रिटिश भारताच्या मद्रास इलाख्यातील ब्रिटिश अधिकारी जॉन स्मिथ हा वाघाच्या शिकारीसाठी गेल्याने २८ एप्रिल, इ.स. १८१९ रोजी लागला. स्मिथने येथील दहाव्या क्रमांकाच्या लेणीतील एका खांबावर आपले नाव आणि तारीख कोरून ठेवल्याचे आजही अंधुकपणे दिसून येते. पुरातत्त्वशास्त्रीय पुराव्यानुसार ही लेणी दोन वेगवेगळ्या कालखंडांत निर्माण केली गेली. ९, १०, १२, १३ व १५-अ ही लेणी हीनयान कालखंडात कोरली गेली असावीत. हा कालखंड साधारणतः इ.स. पूर्व दुसऱ्या शतकाच्या सुमारास सुरू झाला.या सगळ्या लेण्यांतून बुद्धांचे दर्शन स्तूप-रूपांत होते. या व्यतिरिक्त १ ते २९ क्रमांकांची लेणी साधारणतः ८००-९०० वर्षांनंतर (इ.स.च्या सहाव्या व सातव्या शतकाच्या आसपास) महायान कालखंडात

निर्माण केली गेलेली असावीत. या लेण्यांतून बुद्धांचे सर्वसामान्य लोकांस परिचित असे रूप दिसून येते. महायान लेणी वाकाटक राजांच्या राजवटीत निर्मिली गेली, त्यामुळे त्यांस बऱ्याचदा *वाकाटक लेणी* असेही संबोधले जाते. वाकाटक साम्राज्याच्या ऱ्हासानंतर लेण्यांची निर्मिती अचानक थांबली व ही लेणी योजित भव्यतेपासून वंचितच राहिली.

## इतिहासातील नोंदी

मध्ययुगातील अनेक चिनी बौद्धधर्मीयप्रवाशांनी अकबराच्या काळापर्यंत उपलब्ध असलेल्या आपल्या प्रवासवर्णनांत या लेण्यांचा उल्लेख केला आहे. जंगलाने वेढलेल्या असल्याने या लेणी अज्ञात होत्या.

# बौद्ध संप्रदायाचे प्रतिबिंब

अजिंठा निर्मिती करणाऱ्या कलाकारांनी विहार आणि चैत्य अशा दोन प्रकारे या लेण्यांची निर्मिती केलेली आहे.या लेण्यांमधील भिंती आणि छतांवर चितारलेल्या चित्रांमधून भगवान बुद्धांच्या जीवनातील विविध प्रसंग आणि अनेक बौद्ध विभूतींचे चित्रण आढळते. जातक कथांच्या आधारे केलेले कथांचे अंकन या लेण्यांमध्ये दिसून येते. शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून येथील शिल्पे जगभरात मान्यता पावली आहेत. चित्रांमधून व्यक्त होणाऱ्या मानवी भावभावना हे या चित्रांचे वैशिष्ट्य आहे.[

बौद्ध धर्मातील हीनयान आणि महायान अशा दोन संप्रदायांचे तत्त्वज्ञान अजिंठा लेण्यात पाहायला मिळते. उत्खनने आणि बौद्ध धर्माचे उपलब्ध साहित्य याच्या आधारे अभ्यासक विविध मते नोंदवीत असतात. त्यांच्या मतानुसार हीनयान संप्रदायाच्या लेण्यांमध्ये चैत्यगृह पाहायला मिळते, मात्र महायानपंथीय लेण्यात चैत्यगृहांचा समावेश नसतो. चैत्यगृह म्हणजे स्तूप असलेले मंदिर होय.

# चित्रकला




प्रसिद्ध चित्र

अजिंठ्यातील चित्रे ही प्रामुख्याने बुद्धांच्या जीवनावर आधारित जातक कथांचे चित्रण करतात. बुद्धाच्या जन्मापूर्वीपासूनच्या कथा यामध्ये समाविष्ट आहेत या कथांमधून सांस्कृतिक दुवे तसेच नीतिमूल्ये दिसून येतात.बुद्धाचे आयुष्य, त्याचे विविध अवतार, त्याचे पुढील जन्म असे सर्व वर्णन या जातक कथांमध्ये दिसून येते. भिंतींवरील जातकांची चित्रे ही बोधप्रद आहेत.

दहाव्या आणि अकराव्या लेण्यातील सातवाहनकालीन चित्रकला पाहून तत्कालीन चित्रकारांचे कौशल्य लक्षात येते. एका चित्रात अनेक लोकांचा समूह चित्रित करण्याची या चित्रकारांची हातोटी विलक्षण आहे.

# रचना/स्वरूप



अजिंठा लेण्यांचा नकाशा

अजिंठा येथे एकूण २९ लेण्यांपैकी हीनयान कालखंडातील लेण्यांमधली ९व्या व १०व्या क्रमांकाची लेणी ही चैत्यगृहे आहेत व १२, १३, आणि १५-अ क्रमांकाचे लेणे हे विहार आहे. महायान कालखंडातील लेण्यांपैकी १९, २६ व २९ क्रमांकाची लेणी चैत्यगृहे असून १, २, ३, ५, ६, ७, ८, ११, १४, १५, १६, १७, १८, २०, २१, २२, २३, २४, २५, २७ व २८ क्रमांकांची लेणी विहार आहेत.


या लेण्यांचे क्रमांक त्यांच्या निर्मितीकालानुक्रमे दिलेले नसून एकापाठोपाठ एक येणाऱ्या लेण्यांनुसार दिले आहे. प्राचीन भारतात वास्तुकला, शिल्पकला तसेच नगररचना ही केवळ अद्भुतच नव्हती तर तत्कालीन विषम परिस्थितीत सुध्दा कलेचा विकास किती उत्तुंग होता ह्याची कल्पना आपल्याला हडप्पा व मोहेंजदडो येथील पुरातत्व अवशेष व पुरावे ह्यावरून कळून येते. शिल्पकलेचा वापर व विकास हा प्राचीन भारतासोबतच संपूर्ण

विश्वातच जवळपास एकसारखाच झाल्याचा आभास इतिहासातून स्पष्टपणे होतो. तत्कालीन शिल्पकला व वास्तुकला यावर समकालीन कला, संस्कृती सोबतच धार्मिक मान्यता व जीवनपद्धती याचा प्रभाव जाणवतो.

अश्याच शिल्पकलाकृतीचा अद्भुत संगम आपल्याला महाराष्ट्रातील अजिंठा येथील वास्तू व शिल्पकलेत दिसून येतो, शिल्पकलेला भिंती वरील चित्रशैलीची सुंदर जोड व तसेच पाषाण मूर्तीला मानवी भावनांचे तंतोतंत भावआविष्कार ह्याची सांगडच निर्मात्याने घातल्याचा अनुभव येतो. अश्याच भावविभोर करणाऱ्या भव्य शिल्प कला कृतीची आपण येथे माहिती घेणार आहोत.

## लेण्यांचा अनुक्रम

**लेणे क्र१.**



येथे वीस खांबांवर आधारित एक दालन आहे. या खांबांवर सुंदर असे नक्षीकामही केलेले आहे. भगवान बुद्धांच्या पूर्वजन्मावर आधारित जातक कथा येथील चित्रांत दिसून येतात. बुद्धाच्या विविध प्रकारच्या मुद्रा, पद्मपाणी, दरबार दृश्य, पक्षी, फुले, फळे यांचे छतांवरील अंकन या लेण्यात पहायला मिळते.

**लेणे क्र२.**



छतावरील चित्र

यामध्ये डाव्या बाजूस हंसाच्या जन्माची कथा आहे. बुद्धांची आई महामाया आपले स्वप्न पती राजा शुद्धोधनास सांगत आहे. बुद्धांचा जन्म, छतावरील नक्षी यांचे अंकन या लेण्यात केलेले दिसते.

**लेणे क्र३.**

सदर लेणे अपूर्णावस्थेत आहे.

**लेणे क्र४.**

हे सर्वात मोठे लेणे आहे. यामध्ये २८ खांब असून दरवाजावर द्वारपालांची जोडी आहे. आतमध्ये बुद्धांच्या सहा मोठ्या मूर्ती आहेत.

**लेणे क्र५.**

हे लेणे अपूर्णावस्थेत आहे. बुद्धांच्या काही आकृती येथे कोरलेल्या आहेत.

**लेणे क्र६.**

हे लेणे दोन मजली असून सभागृहात बुद्धांची पद्मासन मुद्रेतील मूर्ती आहे. प्रवेशद्वारावर मगरींचे व फुलांचे अर्धगोलाकार आर्य बनवलेले आहे.

**लेणे क्र७.**

येथे आसनस्थ बुद्धाची मूर्ती आणि त्यामागील भिंतीवर प्रभामंडळ कोरलेली आहे.

**लेणे क्र८.**

या लेण्यात काहीही कोरलेले नाही. पर्यटन विभागाने येथे विद्‌युतगृह स्थापिले आहे.

**लेणे क्र९.**



लेणी क्र मधील चैत्य यामध्ये ९.बुद्धमूर्ती दिसत नाही

या लेण्यातील चैत्याची रचना काटकोनात केलेली आहे. चैत्याच्या मध्यभागी अखंड दगडात कोरलेला अर्धवर्तुळाकार स्तूप आहे. भिंतीवर बुद्धाचे भावदर्शन घडविणारी अस्पष्ट चित्रे आहेत.

**लेणे क्र१०.**

हे <u>हीनयान</u> पंथीय <u>विहार</u> आहे. यात ४० खांब असून त्यावर सुंदर कोरीव कामे केलेली आहेत. या लेण्यातील स्तूपावर <u>पाली</u> भाषेतील लेख धम्म लिपीत कोरलेले आहेत. या लेण्याची निर्मिती इ.स.पू. दुसऱ्या शतकाच्या आधी झाली असे या लेखांवरून दिसून येते.

**लेणे क्र११.**

या लेण्याचा सभामंडप मोठा आहे. सभामंडपात पूजास्थानी बुद्धाची मूर्ती आहे.

**लेणे क्र१५ते १२.**

या लेण्यांमध्ये विशेष मूर्ती/आकृती किंवा कोरीव कामे नाहीत.

**लेणे क्र१६.**

या लेण्यात महत्त्वाची चित्रे आहेत. बुद्धाच्या जीवनातील घटना येथे दाखविण्यात आल्या आहेत.येथील कथकली नृत्याची चित्रे उल्लेखनीय आहेत. आतमध्ये बुद्धांची भव्य मूर्ती आहे. तसेच परलम्बापर मुद्रा, हत्ती, घोडे, मगर यांचीही चित्रे येथे कोरलेली आहेत. छतावरही सुंदर चित्रकला आढळते.

**लेणे क्र१७.**

या लेण्यात बुद्धाच्या जीवनातील प्रसंग कोरले आहेत. आतमध्ये बुद्धांची मूर्ती आहे. भगवान बुद्ध आपली पत्नी <u>यशोधरा</u> आणि

मुलगा राहुल यांच्याकडे भिक्षा मागत असल्याचे प्रसिद्ध चित्र या लेण्यात आहे. पूर्वजन्मी बुद्ध अनेक सोंडांचा हत्ती असल्याचे चित्रही या लेण्यात दिसते. येथील छतावर परीकथा चित्रित केल्या आहेत.

**लेणे क्र१८.**

हे लेणे रिकामे असून यात पाण्याचे तळे आहे.

**लेणे क्र१९.**

हा घोड्याच्या नालेच्या आकाराचा विहार आहे. तीन छत्रींचा एक स्तूप येथे असून त्यावर बुद्धमूर्ती कोरलेल्या आहेत.

**लेणे क्र२०.**

**लेणे क्र२१.**

हा अंशतः अपूर्ण राहिलेला विहार आहे. या विहारात नक्षीकाम केलेले स्तंभ आहेत. भगवान बुद्ध आपल्या शिष्यांना प्रवचन देत असल्याचे चित्रपट येथील भिंतीवर पहायला मिळते. समृद्धीची देवता हरिती, तिचे सेवक, सर्पराज नागाचा दरबार अशी शिल्पे येथे दिसून येतात.

**लेणे क्र२२.**

यामध्ये सात मानुषी बुद्ध बोधिवृक्षाखाली मैत्रेयासह चित्रित केलेल्या दिसतात. डाव्या भिंतीवर सुंदर चित्रे कोरलेली आहेत. उर्वरित लेणे अपूर्ण आहे.

**लेणे क्र२३.**

हे लेणे अपूर्ण असून खांबांवर मात्र कलात्मक कलाकृती आहेत.


**लेणे क्र२४.**

क्षेत्रफळाच्या दृष्टीने हे लेणे मोठे आहे. याची भव्यता आणि कलात्मकता वैशिष्ट्यपूर्ण मानली जाते. जलदेवता, नागराज, द्वारपाल अशी शिल्पे येथे दिसून येतात.

**लेणे क्र२५.**

हा अपूर्ण विहार आहे. यात केवळ एक अंगण आहे.

**लेणे क्र२६.**



भगवान बुद्धाचे महापरिनिर्वाण

या लेण्यात भगवान बुद्धांचे महापरिनिर्वाण शिल्पांकित केलेले दिसून येते. तसेच बुद्ध एका वृक्षाखाली बसलेले असल्याचेही एक चित्र येथे आहे.

**लेणे क्र२७.**

हे लेणे दोन मजली असून अपूर्णावस्थेत आहे.

**लेणे क्र२८.**

हे लेणे उंच दगडावर आहे. या लेण्यात स्तंभ व अंगण आहे.

**लेणे क्र२९.**

हे लेणे सुद्धा उंच दगडावर आहे. या लेण्यात फक्त खोदकाम झालेले दिसते. विहार साधारणपणे चौरस आकाराचे असून त्यांची लांबी-रुंदी १७ मीटर (५२ फुटा) पर्यंत आहेत. हे विहार मुख्यत्वे भिक्खूंना राहण्यासाठी होते, तर चैत्यगृहे सुद्धा पारंपरिकरीत्या पूजाअर्चेसाठी वापरण्यात येत. कालांतराने विहारांतही मूर्तींची स्थापना झाली. बऱ्याच विहारांना सोपा व अंगण असून तेथे दगडात कलाकुसर केली असून चित्रेही आहेत.

# निष्कर्ष

- ✓ लेण्यांच्या जवळील ज्या काही लोकांनी अतिक्रमण केलेलं आहे त्याची नगरपालिकेने दखल घेतली पाहजेत.
- ✓ लेण्यांच्या आतील व बाहेरील परिसरात घान नियमित साफ करण्या साठी एका कामगार ठेवावा,
- ✓ लेण्यांच्या मद्ये झाडी व फुलबाग लावावीत
- ✓ लेणी बघण्या साठी सर्वांगीण परवानगी द्यावी मग पर्यटक हिंदू असो अथवा मुस्लिम आपली संस्कृती आपण जोपासली हवी.
- ✓ बौद्ध भिक्कूनसाठी विहार तयार केले पाहिजेत .
- ✓ गाईड इंग्रजी तथा सर्व भाषेत बोलणारे असले पाहिजेत.
- ✓ सरकारने त्यांना अनुदान दिले पाहिजे .
- ✓ सर्वच लेण्या महाराष्ट्रातील जतन केल्या पाहिजेत .

# <u>संदर्भ</u>


1. http://asi.nic.in/asi_monu_whs_ajanta.asp
2. ^ Gopal, Madan (1990). *India Through the Ages (English भाषेत) (First Edition edition ed.). Publications Division. p. 173.*
3. ^ *स्पिंक, वॉल्टर एम. अजंता : हिस्ट्री अँन्ड डेव्हलपमेंट (इंग्रजी भाषेत(. २६ एप्रिल, २०१२ रोजी पाहिले. Going down into the ravine where the caves were cut, he scratched his inscription (John Smith, 28th Cavalry, 28th April, 1819) across the innocent chest of a painted Buddha image on the thirteenth pillar on the right in Cave 10..* |ॲक्सेसदिनांक= मधील दिनांक मूल्ये तपासा )सहाय्य)
4. ^ *"Ticketed Protected Monuments of Maharashtra – Archaeological Survey of India". asi.nic.in. 2018-03-25 रोजी पाहिले.* line feed character in `|title=` at position 71 (सहाय्य)
5. ^ *"महाराष्ट्रातील सात वंडर्सची घोषणा". 2018-03-25 रोजी पाहिले.*